पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
Diamond Jewellery Launching
(Coming Soon)
Vacancy for
4 Sales Officers
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०८। किंमत - ४ रु संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । ०६/०५/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
राजेन्द्र
विश्वासाची सार्थ परंपरा...

## सत्तेच्या हव्यासापोटी महाराष्ट्र संकटात



पुणे (वृत्तसंस्था)

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण राज्याला हादरवून सोडले आहे. या अमानुष प्रकारावर तीव्र प्रतिक्रिया देताना राज ठाकरे यांनी संतप्त शब्दांत आपली भूमिका मांडली आहे. त्यांनी या घटनेचा निषेध करत, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली आहे. तसेच अशा प्रकारच्या घटनांमध्ये सरकारने केवळ आश्वासन न देता ठोस आणि तातडीची कारवाई करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज ठाकरे यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे की, अशा प्रकारच्या गुन्ह्यांनंतर सरकार फास्ट ट्रॅक, कारवाईची भाषा करते, मात्र त्याचा नेमका अर्थ काय, हे स्पष्ट होत नाही. प्रत्येक वेळी घटना घडल्यावरच प्रशासन जागं होतं, ही बाब चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यात महिलांवरील अत्याचार, अपहरण आणि शोषणाच्या घटना सातत्याने वाढत आहेत, हे वास्तव गंभीर असून कायद्याचा धाक उरलेला नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. नसरापूरमध्ये घडलेल्या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी आंदोलन केल्याची माहिती समोर आली होती. या आंदोलनावर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याच्या बातम्यांवरही राज ठाकरे यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, आंदोलकांवर कारवाई करण्यात सरकार तत्परता दाखवते, मात्र गुन्हेगारांवर तितकीच कठोर कारवाई का होत नाही? हा दुहेरी निकष थांबवण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

## संगमनेरात गोवंश तस्करीचा पर्दाफाश

### कोंडवाड्यात गुदमरून २ बैलांचा मृत्यू, २७ जनावरांना जीवदान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात गोवंश तस्करीचे रॅकेट पुन्हा डोके वर काढताना दिसत असून, पोलीस उपअधीक्षकांच्या पथकाने सोमवारी मध्यरात्री धडक कारवाई करत अवैध जनावर वाहतुकीचा मोठा पर्दाफाश केला. वडगाव पान-तळेगाव मार्गावर हॉटेल अमर परिसरात सापळा रचून आयशर टेम्पो पकडण्यात आला. या कारवाईत दोन मृत बैलांसह तब्बल २९ जनावरांची सुटका करण्यात आली असून, सुमारे २३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मात्र पोलिसांची चाहूल लागताच चालकाने अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पलायन केले.

उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांना मिळालेल्या खात्रीलायक गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. सोमवारी रात्री उशिरा विटकरी रंगाच्या आयशर टेम्पोमधून (क्र. झइ ०५ ड ४१५७) जनावरांना अत्यंत अमानुषपणे दाटीवाटीने कोंबून कत्तलीसाठी मालेगावच्या दिशेने नेले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पथकाने रणनीती आखत सापळा रचला.

दरम्यान, पोलिसांचा वेढा लक्षात येताच चालकाने महामार्गावरच टेम्पो सोडून पळ काढला. पोलिसांनी तात्काळ वाहनाची झडती घेतली असता आतले दृश्य अंगावर शहारे आणणारे होते. कोंडवाड्यासारख्या अवस्थेत कोंबलेल्या २९ बैलांपैकी दोन बैलांचा गुदमरून मृत्यू झालेला आढळला. उर्वरित २७ जनावरे गंभीर अवस्थेत होती. पोलिसांनी तातडीने त्यांची सुटका करून त्यांना जीवदया गोरक्षण संस्था, सायखिंडी येथे सुरक्षित हलवले. या कारवाईत अंदाजे १५ लाख रुपये किंमतीचा टेम्पो आणि सुमारे ८ लाख रुपये किंमतीची जनावरे असा एकूण २३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल राहुल सारबंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चालकाविरुद्ध प्राण्यांना ...... (पान ३ वर)

## क्रीडा संकुलाची कोसळली भिंत

### खेळाडूंची सुरक्षितता धोक्यात

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर- संगमनेर शहरातील भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकूलाची भिंत अचानक कोसळली. त्यामुळे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या ठिकाणी सकाळी क्रिकेट खेळणाऱ्या अनेक मुलांचा यात जीव वाचला. या क्रीडा संकुलनाची भिंत गेल्या अनेक कालावधीपासून झुकलेली होती. कोणत्याहीक्षणी ही भिंत कोसळून अपघात होईल अशी शक्यता वर्तविली जात होती. मात्र त्याकडे संबंधीत प्रशासनाने दुर्लक्ष केले. आज मंगळवारी सकाळी अखेर ही भिंत कोसळली.

जिल्ह्यात तालुका स्थरावर असलेले संगमनेरातील हे ऐकमेव मोठे क्रीडांगण आहे. या ठिकाणी दरवर्षी राज्यस्तरीय सहकारमहर्षी चषक क्रिकेट स्पर्धा होतात. राज्यभरातून खेळाडू सहभागी होतात. अशा या क्रिडा संकुलाची मोठी भिंत कोसळल्याने क्रीडा प्रेमींमध्ये मोठा रोष व्यक्त केला जात आहे. पालिकेने तातडीने या क्रिडा संकुलाची भिंत पुन्हा उभी करावी अशी मागणी क्रीडा प्रेमी करत आहे.



## नसरापूर अत्याचाराच्या निषेधार्थ संगमनेरमध्ये कॅन्डल मार्च

### आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा द्या, महाराष्ट्रात महिला असुरक्षित - डॉ जयश्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन चिमुकलीवर वृद्ध नागरिकाने केलेला अत्याचार हा महाराष्ट्रासाठी काळीमा फासणारा आहे. अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी अत्यंत कठोर कायदा करणे गरजेचे असून अशा नराधमांना तात्काळ मृत्युदंडाची शिक्षा झाली पाहिजे अशी आग्रही मागणी संगमनेर तालुका युवक कॉंग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केली असून नसरापूर घटनेच्या निषेधार्थ संगमनेरमध्ये भव्य कॅण्डल मार्च काढण्यात आला.

संगमनेर शहर व तालुक्यातील नागरिक व महिलांच्या वतीने संगमनेर बसस्थानक येथे नसरापूर घटनेच्या निषेधार्थ भव्य कॅन्डल मार्च काढण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा, शेखर सोसे, नगरसेवक किशोर टोकसे, विशाल ढोले, सिद्धेश घाडगे, मनीषा राहणे, प्रियंका जगनर, वनिता गाडे, विशाल ढोले प्रकाश कडलग, प्राची कवडे, अर्चना दिघे, प्राजक्ता कुलकर्णी, तनिष्का कुलकर्णी, समीर कुलकर्णी, ललित शिंदे, शर्मिला हांडे, सुभाष दिघे प्रीतम साबळे, प्राजक्ता घुले, वृषाली साबळे, डॉ. अनुराधा सातपुते, सरोज पगडाल, नंदा गरुडकर, यशवंती नरवडे, श्रीकांत साबळे, शरद पावबाके, सोमनाथ गोडसे ऋत्विक राऊत, शुभम शिंदे, मयूर घुले, अलोक बर्डे, सुरभी मोरे, वैशाली कडबाने, अमृता राऊत, तात्याराम कुटे आदींसह शेकडो नागरिक व महिला उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये महिला सुरक्षित देशामध्ये दररोज महिलांवर अत्याचार होत आहेत सरकार कोणतीही ठोस कारवाई करत नाही वडगाव पान येथील चिमुकलीवर ॲसिड फेक हल्ल्याला ४५ दिवस होऊन गेले तरी आरोपी अद्याप सापडत नाही. हे दुर्दैवाचे असून छत्रपती शिवाजी महाराज महिलांवरील अत्याचारासाठी चौरंगा करण्याची शिक्षा द्यायचे त्याचप्रमाणे अत्यंत कठोर शिक्षा या घटनेतील आरोपींना द्याव्या अशी मागणी त्यांनी केली.

तर सौ. दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, मुली सुरक्षित नाहीत लहान मुलींनी शाळेत जायचे कसे. महिला सुरक्षित नाहीत. दिवसेंदिवस महिलांवर वाढणारे अत्याचार हे अत्यंत दुर्दैवी आहे या अत्याचारातील नराधमांना मृत्यू दंडापेक्षाही कठोर शिक्षा झाली पाहिजे जेणेकरून यापुढे कोणीही अशी अत्याचार करण्याची हिम्मत करणार नाही.

तर डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, एक आई म्हणून, एक स्त्री म्हणून मुलींची काळजी वाटत आहे सरकारने वेळ न दवडता तातडीने अत्यंत कठोर कारवाई येणारा धमाल करावी त्याचप्रमाणे यापुढील काळात महिलांची काळजी घेणारे कायदे कातडीने निर्माण करावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी उपस्थित लहान मुलींच्या हस्ते निवेदन स्वीकारले .यावेळी पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासह शासकीय अधिकारी उपस्थित होते.

## संगमनेरमध्ये महामार्गावर दरोडा

### चालकास मारहाण करून ९३ हजारांचा मुद्देमाल लंपास

संगमनेर (प्रतिनिधी) - नाशिक-पुणे महामार्गावर संगमनेर शहराजवळील डी-मार्ट परिसरात पहाटेच्या सुमारास थरारक दरोड्याची घटना घडली आहे. सहा अज्ञात आरोपींनी मालवाहू पिकअप अडवून चालकास मारहाण करत सुमारे ९३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने लंपास केला.



याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६४/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम ३१० (भा.द.वि. ३९५, ३९७ समतुल्य) अंतर्गत दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शैलेश नारायण शेलार (वय ३४, रा. खैरवाडी, ता. निफाड, जि. नाशिक) हे मालवाहू पिकअप वाहनातून कंपनीचा माल घेऊन नाशिकहून चेन्नईकडे जात होते. दि. २८ एप्रिल २०२६ रोजी पहाटे सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास सायखिंडी गावाच्या शिवारात डी-मार्टजवळ सहा अज्ञात इसमांनी त्यांच्या वाहनास चारचाकी डस्टर कार आडवी लावून अडवले.

आरोपींनी आरडाओरडा करत शेलार यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच लोखंडी कोयत्यांचा धाक दाखवून त्यांच्याकडील मोबाईल, दागिने व रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून घेतली. यामध्ये सुमारे ३० हजार रुपये किमतीचा विवो मोबाईल, २५ हजारांच्या सोन्याच्या बाळ्या, १२ हजारांच्या चांदीच्या अंगठ्या, ८ हजार ५०० रुपये रोख तसेच फोन-पे द्वारे १८ हजार रुपये असे एकूण ९३ हजार ५०० रुपयांचे नुकसान झाले आहे.

घटनेत जखमी झालेल्या फिर्यादीने उपचारानंतर प्रकृती सुधारल्यानंतर पोलिसांत तक्रार दिली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक बारवकर व अधिकारी श्रीकांत सावंत यांनी घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला आहे.

ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सुवर्णस्पर्शने होईल
प्रत्येक क्षण समृद्धीचा...
लग्नासराईसाठी खास ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
60 % पर्यंत
भरघोस सूट!
ऑफर कालावधी: १ एप्रिल ते १८ मे २०२६
सोने । चांदी । हिरे | अशोक चौक, संगमनेर. मो : 937201 2044

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
आपल्यासाठी घेऊन आले आहे
विवाह खरेदी
मोहत्सव निमित्त
मजुरीवर 25%
डिस्कऊंड
ऑफर फक्त 27 एप्रिल ते 17 मे पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/70661 49090

# एकाच दिवशी रोखले 10 बालविवाह

## वधू-वरांच्या पालकांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - महिला व बालविकास विभागाच्या सतर्कतेमुळे जिल्ह्यात एका दिवसात ११ बालविवाह थांबविण्यात प्रशासनाला यश मिळाले आहे. या कारवाईमुळे बालविवाह प्रतिबंधाबाबत प्रशासनाची सजगता अधोरेखित झाली आहे. दरम्यान, रोखण्यात आलेल्या बालविवाह प्रकरणी संबंधित अल्पवयीन वधू आणि वरांच्या पालकांना जिल्हा महिला बालकल्याण विभागाच्यावतीने नोटीस बजावून गुन्हा दाखल करण्याची नोटीस बजावण्यात आलेली आहे.

रविवार ३ मे २०२६ रोजी जिल्ह्यात मोठी लग्नतिथी होती. या दिवशी जिल्ह्यात तब्बल एकाच दिवशी ११ बालविवाह होत असल्याची गुप्त माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे बालविवाह रोखण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईत नगर शहरात ३, अकोलेत १, राहुरी १, श्रीगोंदा १, पाथर्डी १, नेवासा १ आणि नगर तालुक्यात १, श्रीरामपूर १ असे १० बालविवाह थांबविण्यात आले. या मोहिमेत पोलीस यंत्रणा, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, जिल्हा बालसंरक्षण कक्ष तसेच चाइल्ड हेल्पलाइन कक्ष यांचा सक्रिय सहभाग राहिला. सर्व यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधून ही कारवाई करण्यात आली. नागरिकांनीही अशा घटनांची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी व सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, बालविवाह रोखण्यात आलेल्या वधू आणि वरांच्या पालकांना जिल्हा बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असून यापुढे त्यांनी बालविवाह केल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची नोटीस बजावण्यात आलेली आहे. रविवारी जिल्ह्यात मोठी लग्नतिथी होती. या दिवशी ११ ठिकाणी बालविवाह लावण्याचा घाट घालण्यात आला होता. मात्र, तो महिला बालकल्याण विभागाने उधळून लावला.

बालविवाह लावणाऱ्या वधू-वरांच्या पालकांसह लग्न लावून देणारे भटजी, मंगल कार्यालयाचे मालक, केटर्स, लग्नाला हजर राहणाऱ्या व्यक्तींवर बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ नूसार गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. असे महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांना सक्तीने वस्तू विक्री केल्यास परवाने रद्द

## कृषी सेवा केंद्रांवर साठा व दर दर्शविणारे फलक अनिवार्य- ना. विखे

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक खपवून घेतली जाणार नाही. सर्व अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयात न बसता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काम करावे. कृषी सेवा केंद्रांबाहेर खतांचा साठा व दर दर्शविणारे फलक लावणे अनिवार्य असून, शेतकऱ्यांना अनावश्यक वस्तू खरेदी करण्यास सक्ती केल्यास संबंधितांचे परवाने रद्द करून कडक कारवाई करण्यात यावी. तसेच पावसाळ्यात जळलेली वीज रोहित्रे ४८ तासांच्या आत बदलून द्यावीत, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.




खरीप पूर्व हंगाम नियोजन बैठक पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शिर्डी नगराध्यक्षा जयश्री थोरात, राहाता नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व शिर्डी उपनगराध्यक्ष अभय शेळके आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, हवामानातील बदलांमुळे उद्भवणाऱ्या संकटांबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे अत्यावश्यक आहे. पावसाचा खंड पडल्यास पिके टिकवण्यासाठी ८५ ते ९० दिवसांत येणाऱ्या वाणांची शिफारस कृषी विभागाने करावी. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या सर्व उपाययोजनांची माहिती पोहोचवण्यासाठी माहितीपुस्तिका तयार करून ती प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत वितरित करावी. कृषी सहाय्यकांच्या भेटीचे दिवस व संपर्क क्रमांक ग्रामपंचायतीबाहेर ठळकपणे प्रदर्शित करावेत, अशी सूचना त्यांनी केली.

शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना तंत्रज्ञानसाक्षर करणे आवश्यक आहे. मजुरांची टंचाई लक्षात घेता फवारणीसाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच शेतीमालाचे रोजचे बाजारभाव समजण्यासाठी क्यूआर कोड तयार करून तो सर्वत्र प्रदर्शित करावा. अल्पभूधारक शेतकऱ्यांना महागडी अवजारे घेणे शक्य नसल्याने गावागावांत अवजार बँक स्थापन करावी. ठिबक सिंचनाचा अवलंब वाढवून पाण्याचा काटेकोर वापर करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पीक कर्जवाटपाचा आढावा घेताना पालकमंत्र्यांनी बँकांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. पीक कर्जासाठी सिबिल गुणांची अट शासनाने शिथिल केलेली असतानाही बँका शेतकऱ्यांची अडवणूक करत असतील, तर संबंधित शाखाधिकाऱ्यांवर थेट कारवाईचा प्रस्ताव पाठवावा. खरिपाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक सहाय्य आवश्यक असल्याने कर्जवाटप निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सौर कृषी पंपासाठी पैसे भरूनही तो न मिळणे तसेच कंत्राटदारांकडून शेतकऱ्यांच्या पाइपलाइनचे होणारे नुकसान याबाबत तातडीने चौकशी करून संबंधित कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना जाब विचारावा. मान्सूनपूर्व कामे तातडीने पूर्ण करावीत. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळावी यासाठी तहसीलदारांनी २४ तास कार्यरत आपत्ती व्यवस्थापन कक्ष सुरू करावा.

रासायनिक खतांचा अतिवापर टाळण्यासाठी प्रबोधन मोहीम राबवावी व नॅनो युरियाच्या वापराचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना बांधावर जाऊन दाखवावे. सेंद्रिय शेती व आधुनिक तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर करणाऱ्या तालुक्यातील उत्कृष्ट शेतकऱ्यांची नावे माहितीपत्रकात समाविष्ट करून इतरांना प्रोत्साहित करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्र्यांबद्दल अश्लील टिप्पणी

# दोघांवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल सोशल मीडियावर खालच्या पातळीवर जाऊन अश्लील टिप्पणी केल्याचा प्रकार संगमनेरमध्ये घडला. यामुळे भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, शहर भाजप अध्यक्षांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोघांविरुद्ध 'अदखलपात्र' गुन्हा दाखल केला आहे. याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार

पायल ताजणे यांना एका भाजप कार्यकर्त्याने फोन करून सोशल मीडियावरील एका ग्रुपवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलच्या आक्षेपार्ह पोस्टबाबत माहिती दिली. संबंधित पोस्टमध्ये फडणवीस यांच्याबद्दल अवमानकारक आणि समाजात तेढ निर्माण होईल अशा भाषेचा वापर करून एका विषयावर चर्चा करण्यात आली होती. शहराध्यक्ष ताजणे यांनी या पोस्टचे स्क्रीनशॉट मिळवून खात्री केली असता, राजकीय द्वेषातून एका जबाबदार राष्ट्रीय नेत्याची बदनामी करण्याचे कारस्थान सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यानंतर त्यांनी पक्षाच्या पोलीस ठाणे गाठून कार्यकर्त्यांसह थेट तक्रार दिली.

त्यानुसार पोलिसांनी 'जागो संगमनेरी..' या नावाने विद्यमान केंद्र व राज्य सरकारवर राजकीय हेतूने वादग्रस्त पोस्ट प्रसिद्ध करणाऱ्या समूहाचा ॲडमीन आणि ही पोस्ट प्रसिद्ध करणाऱ्या मोबाईल क्रमांक धारकावर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक श्रीकांत सावंत या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

या प्रकरणामुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून, सोशल मीडियावरील जबाबदारीने वागण्याबाबत चर्चेला उधाण आले आहे. पोलिसांकडून पुढील पुरावे गोळा करण्याचे काम सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# आश्वी परिसरातील चोऱ्यांमुळे खळबळ

## पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे चोरटे सक्रिय, नागरीक भयभित

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी -संगमनेर तालुक्यातील आश्वी आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून घरफोड्या आणि दिवसाढवळ्या होणाऱ्या चोऱ्यांनी ग्रामस्थांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण केले आहे. सततच्या या घटनांमुळे पोलिसांसमोर आरोपींना पकडण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले असतानाच, खळी येथील नागरिकांनी कमालीची सतर्कता दाखवत एका संशयित व्यक्तीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या संशयिताला सोमवारी (दि. ४) न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

रविवारी (दि. ३) सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास खळी येथील मंदिर परिसरात एक अनोळखी व्यक्ती संशयास्पदरीत्या वावरताना दिसून आली. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखून त्याला त्याचे नाव, गाव आणि तिथे येण्याचे कारण विचारले असता, त्या व्यक्तीने कोणतीही माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला. त्याच्या संशयास्पद हालचाली आणि वागण्यामुळे नागरिकांनी त्याला तातडीने पकडून ठेवले आणि या घटनेची माहिती आश्वी पोलिसांना दिली. रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संगमनेर दौरा असल्याने पोलीसांचा लवाजमा संगमनेर येथे होता.



पकडलेला चोर

मात्र, घटनेची माहिती मिळताच आश्वीचे सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट, सहायक पोलीस उपनिरीक्षक दीपक बर्डे, पोलीस हवालदार अमोल गोसावी आणि नामदेव बिरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी या संशयित व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली, मात्र त्याच्याकडे कोणत्याही आक्षेपार्ह वस्तू आढळून आल्या नाहीत. प्राथमिक तपासणीत सदर व्यक्ती परप्रांतीय असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. तर, सोमवारी (दि. ४) या संशयिताला न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने अधिक तपासासाठी त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, सध्या आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील वाड्या-वस्त्यांवर अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असल्याने पोलीस रात्रीच्या वेळी अत्यंत दक्षतेने गस्त घालत आहेत. या संशयित आरोपीच्या चौकशीतून चोऱ्यांच्या सत्राचे काही धागेदोरे पोलिसांच्या हाती लागतात का, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. नागरिकांनी देखील सतर्क राहून कोणत्याही संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

आश्वी पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या काही दिवसांपासून १० ते १२ चोरट्यांनी हैदोस घातला आहे. ठिकठिकाणी धाडसी चोऱ्या करून मोठ्या प्रमाणावर लुटमार चालली आहे. या परिसरातील वाड्या वस्त्यांवर चोर आला रे...चोर आला... अशा आरोळ्या रोज एकू येत आहे. हजारवाडी, सुळवाडी या परिसरातील डोंगर दऱ्यात हे चोरटे लपल्याची माहिती मिळत आहे. घटना घडल्यानंतर पोलीस फक्त गुन्हा दाखल करतात. मात्र चोऱ्या रोखण्यासाठी कोणतीही प्रभावी उपाय योजना केली जात नसल्याने नागरीकांना चोरट्यांच्या भितीमुळे रात्र जागून काढावी लागत आहे.

# दाढ खुर्दमध्ये बिबट्याचा धुमाकूळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी- संगमनेर तालुक्यात बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढत चालला असून, आता दाढ खुर्द परिसरातील हनुमानवाडी येथे बिबट्याने आपला मोर्चा वळवला आहे. रात्रीच्या सुमारास बिबट्याने शेतकरी अनिल रामभाऊ पाबळे यांच्या वस्तीवर हल्ला चढवत एक शेळी ठार केली.

या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, घटनेला पाच-सहा तास उलटूनही वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी न पोहोचल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल पाबळे हे हनुमानवाडी परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत.

नेहमीप्रमाणे रात्री त्यांनी आपली जनावरे गोठ्यात बांधली होती. मध्यरात्रीच्या सुमारास दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक वस्तीवर हल्ला केला आणि गोठ्यातील शेळीला ठार केले. सकाळी हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच शेतकरी विकास मंडळाचे नेते नितीन पाबळे आणि किशोर जोशी यांनी तातडीने पाबळे यांच्या वस्तीवर धाव घेतली.

त्यांनी घटनेचा पंचनामा करण्यासाठी आणि पुढील उपाययोजनेसाठी वनविभागाशी वारंवार संपर्क साधला. मात्र, दुर्दैवाची गोष्ट म्हणजे घटना घडून पाच ते सहा तास उलटल्यानंतरही वनविभागाचा एकही कर्मचारी किंवा अधिकारी घटनास्थळी फिरकला नाही. वनविभागाच्या या उदासीन कारभारामुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने वनविभागाने तातडीने येथे पिंजरा लावावा आणि अनिल पाबळे यांना झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी नितीन पाबळे व ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने लक्ष दिले नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# फार कष्टाने अन्न पिकते रानात, खाणाऱ्यांनो हवे तेवढेच घ्या पानात

फार कष्टाने धान्य पिकते, खाणाऱ्यांनो हवे तेवढेच घ्या पानात - ही ओळ आपल्याला केवळ अन्नाबद्दल आदर ठेवायला शिकवत नाही, तर समाजातील जबाबदारीची जाणीवही करून देते. आजच्या काळात लग्नसमारंभ, वाढदिवस, मेजवान्या यांसारख्या कार्यक्रमांमध्ये अन्नाची मोठ्या प्रमाणात नासाडी होताना दिसते. ही केवळ संसाधनांची उधळपट्टी नाही, तर शेतकऱ्यांच्या कष्टांचा अपमानही आहे.

आपल्या देशात शेतकरी रात्रंदिवस मेहनत करून धान्य पिकवतो. पावसावर अवलंबून असलेली शेती, कर्जाचा भार, आणि निसर्गाच्या अनिश्चिततेशी झुंज देत तो आपल्या ताटात अन्न पोहोचवतो. पण आपण समारंभात भरपूर पदार्थ पाहून आवश्यकता नसतानाही जास्त अन्न घेतो आणि ते अर्धवट सोडून देतो. त्यामुळे अन्नाचा अपव्यय होतो.

विशेषतः बुफे पद्धतीत लोक अनेक पदार्थ चाखण्यासाठी थोडं-थोडं घेतात, पण शेवटी ते संपवू शकत नाहीत. काही वेळा प्रतिष्ठा दाखवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पदार्थ तयार केले जातात, पण त्यातील बरेचसे अन्न वाया जाते. हा प्रकार थांबवण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करणे आवश्यक आहे.





अन्नाची नासाडी टाळण्यासाठी काही सोप्या उपायांचा अवलंब करता येईल. जेवताना प्रथम कमी प्रमाणात अन्न घ्यावे आणि गरज असल्यास पुन्हा घ्यावे. आयोजकांनीही पाहुण्यांची संख्या लक्षात घेऊन योग्य प्रमाणातच अन्नाची तयारी करावी. उरलेले अन्न गरजू लोकांना देण्यासाठी सामाजिक संस्थांशी संपर्क साधता येतो. अनेक ठिकाणी अशा संस्था कार्यरत आहेत ज्या उरलेले अन्न योग्य प्रकारे गरजूंना पोहोचवतात.

याशिवाय, अन्नाबद्दल कृतज्ञता आणि संवेदनशीलता निर्माण करणेही महत्त्वाचे आहे. मुलांपासूनच अन्नाची किंमत शिकवली गेली पाहिजे. अन्न हे पूर्णब्रह्म आहे ही भारतीय संस्कृतीतील भावना आपण जपली पाहिजे.

शेवटी, अन्न वाचवणे म्हणजे केवळ पैशांची बचत नाही, तर पर्यावरणाचे संरक्षण आणि समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडणे आहे. त्यामुळे पुढच्या वेळी जेव्हा आपण एखाद्या समारंभात जेवायला जाऊ, तेव्हा ही ओळ लक्षात ठेवूया - हवे तेवढेच घ्या पानात, अन्नाची नासाडी टाळा आणि शेतकऱ्यांच्या कष्टांचा सन्मान करा.

# तीव्र उन्हापासून संरक्षण करण्याचे उपाय

उन्हाळ्याच्या दिवसांत तापमान झपाट्याने वाढत असल्यामुळे मानवी आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः एप्रिल ते जून या कालावधीत तीव्र उष्णतेमुळे उष्माघात, डोकेदुखी, चक्कर येणे, अशक्तपणा, त्वचेचे विकार आणि निर्जलीकरण (डिहायड्रेशन) यांसारख्या समस्या उद्भवतात. त्यामुळे या काळात स्वतःची आणि कुटुंबाची योग्य काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.




सर्वप्रथम, दुपारी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत उन्हाची तीव्रता जास्त असते, त्यामुळे शक्यतो या वेळेत बाहेर पडणे टाळावे. जर बाहेर जाणे आवश्यक असेल, तर डोक्यावर टोपी, रुमाल किंवा स्कार्फ वापरावा. छत्रीचा वापर केल्यास थेट सूर्यप्रकाशापासून संरक्षण मिळते. तसेच, डोळ्यांचे रक्षण करण्यासाठी चांगल्या प्रतीचे सनग्लासेस वापरणे उपयुक्त ठरते.

उन्हाळ्यात कपड्यांची निवडही महत्त्वाची असते. हलक्या रंगाचे, सैल आणि सूती कपडे परिधान केल्यास शरीराला हवा खेळती राहते आणि उष्णतेचा त्रास कमी होतो. गडद रंगाचे व घट्ट कपडे टाळावेत, कारण ते उष्णता अधिक शोषून घेतात. पाण्याचे योग्य प्रमाणात सेवन करणे हा उन्हाळ्यातील सर्वात महत्त्वाचा उपाय आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास निर्जलीकरण होऊ शकते. त्यामुळे दिवसातून वारंवार पाणी पिणे आवश्यक आहे. यासोबतच ताक, लिंबूपाणी, नारळपाणी, फळांचे रस यांसारखी नैसर्गिक पेये घ्यावीत. अतिशय थंड पेये, शीतपेये किंवा कॅफिनयुक्त पदार्थ टाळावेत, कारण ते शरीरासाठी अपायकारक ठरू शकतात. आहार हलका व पचायला सोपा असावा. फळे, भाज्या, सलाड यांचा आहारात समावेश करावा. कलिंगड, काकडी, संत्री, द्राक्षे यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे खाल्ल्यास शरीराला थंडावा मिळतो. तळलेले, मसालेदार व जड अन्न टाळावे. उन्हातून घरी आल्यानंतर लगेच थंड पाणी पिणे किंवा एसीसमोर बसणे टाळावे. आधी थोडा वेळ सावलीत किंवा थंड जागेत विश्रांती घ्यावी आणि मगच पाणी पिणे योग्य ठरते. तसेच, शरीराला घाम आल्यावर स्वच्छता राखणेही महत्त्वाचे आहे.

लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. त्यांना जास्त वेळ उन्हात ठेवू नये. गरज भासल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा. थोडक्यात, योग्य सवयी, संतुलित आहार आणि सावधगिरी बाळगल्यास आपण तीव्र उन्हापासून स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे प्रभावीपणे संरक्षण करू शकतो.












# पोलिस दलात स्थान मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले - आ. खताळ

संगमनेर
(प्रतिनिधी)-
ग्रामीण भागातील युवकांनी कठोर परिश्रम, जिद्द व चिकाटीच्या जोरावर पोलिस दलात स्थान मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामागे कुटुंबियांचे त्याग, कष्ट व सातत्यपूर्ण पाठबळ तितकेच महत्त्वाचे असल्याचे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांनी काढले.



संगमनेर तालुक्यातील डोळासने गावाअंतर्गत धुमाळवाडी येथील महाराष्ट्र पोलिस दलात निवड झालेले गणेश रावसाहेब भागवत, योगेश बारकू धुमाळ, विजय प्रभाकर भोईटे, धनंजय सिताराम गांजवे आणि वृषभ यशवंत सुपेकर या तरुणांचा आमदार खताळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर शिवसेनेचे माजी तालुकाध्यक्ष जनार्दन आहेर, भाजप तालुका अध्यक्ष गुलाब भोसले, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष रऊफ शेख, सूर्या करिअर अकॅडमीचे प्रमुख समीर काकड, गणेश सुपेकर, बाबाजी मोरे, दत्ता गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, पोलिस दल हे समाजातील कायदा व सुव्यवस्था राखणारे महत्त्वाचे अंग आहे. महाराष्ट्र पोलिस दलात सेवा करताना या तरुणांनी गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करावे. तसेच, नागरिकांचा पोलिस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी संवेदनशीलतेने जबाबदारी पार पाडावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सत्कारमूर्ती तरुणांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, कुटुंबीय आणि मार्गदर्शकांना दिले. गावातील युवकांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन विविध क्षेत्रांत यश संपादन करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाला ग्रामस्थ, युवक, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिग्रस येथे 'तळमळ' काव्यसंग्रहातील काव्यवाचनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

डिग्रस
(युवावार्ता प्रतिनिधी)-
ज्येष्ठ कवी, लेखक व साहित्यिक एन. डी. कांबळे यांच्या 'तळमळ' या काव्यसंग्रहातील निवडक कवितांचे वाचन नुकतेच डिग्रस, ता. संगमनेर येथे उत्साहात संपन्न झाले. नाशिक गिरणा गौरव प्रतिष्ठानतर्फे आयोजित पुस्तकावर बोलू काही या अभिनव उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला.

महाराष्ट्र दिनाच्या (१ मे) निमित्ताने आयोजित या कार्यक्रमात कांबळे सरांनी आपल्या काव्यसंग्रहातील कविता सादर केल्या. त्यांच्या प्रभावी



काव्यवाचनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के. मा. मोरे सर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र देसले यांनी केले. यावेळी रजनी वाणी आणि सुशिला पिंपरीकर यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी अशोक पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

हुतात्मा स्मारक हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमाला सुरेश पवार, कुलकर्णी सर, अशोक भालेराव, अशोक पाटील, अलका दराडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यप्रेमी, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खुल्या वातावरणात पार पडलेल्या या काव्यवाचन कार्यक्रमाने साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील उपस्थितांना एकत्र आणत साहित्याची मेजवानी दिली.

# संगमनेरात गोवंश तस्करीचा...

(पान नं. ०१ वरुन)

क्रूरतेने वागणूक देणे अधिनियम कलम ३, ११ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या धाडसी कारवाईत बापू हांडे, सुनील ढाकणे यांच्यासह पोलीस पथकाचा सक्रिय सहभाग होता. दरम्यान, या प्रकरणामागे संघटित तस्करीचे मोठे रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता वर्तवली जात असून, फरार चालकाचा शोध सुरू आहे.

तसेच या गोवंशाची तस्करी नेमकी कोणासाठी आणि कोणाच्या सांगण्यावरून केली जात होती, याचाही तपास पोलीस करत आहेत. संगमनेर तालुक्यातील या घटनेमुळे पुन्हा एकदा गोवंश तस्करीचा प्रश्न ऐरणीवर आला असून, संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आह

# पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स पदावरून आंदोलन

अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम, १९९६ (पेसा कायदा) हा आदिवासी समुदायांना स्वशासनाचे अधिकार देणारा ऐतिहासिक कायदा असून तो २४ डिसेंबर १९९६ रोजी देशभर लागू झाला. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाने पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सची नियुक्ती केली आहे.

सन २०१६ तसेच २२ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीत एक ग्रामसभा मोबिलायझर नियुक्त करण्यात आला. मागील ८ ते १० वर्षांपासून हे मोबिलायझर्स गावपातळीवर पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असून अत्यंत तुटपुंज्या मानधनावरही त्यांनी सातत्याने व प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे.

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीत ग्रामसभा बळकट करण्यासाठी मोबिलायझर्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. या प्रयत्नांमुळे काही प्रमाणात सकारात्मक परिणाम दिसून येत असतानाच शासनाने अलीकडे घेतलेल्या निर्णयानुसार तीन ग्रामपंचायतींसाठी एकच मोबिलायझर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय अन्यायकारक व चुकीचा असल्याची भावना संबंधितांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे २००० पेसा मोबिलायझर्स बेरोजगार होण्याची शक्यता आहे. एका बाजूला महिलांच्या सन्मान व हक्कांची भाषा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रमाणात रोजगार कमी करण्याचा निर्णय घेतला जात असल्याची टीकाही करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर, पेसा मोबिलायझर संघर्ष समिती व आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच यांच्या वतीने बुधवार, दि. ६ मे २०२६ रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत पुणे येथे पंचायत राज संचालक कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत.

राज्यातील सर्व पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सनी या आंदोलनात सहभागी होऊन शासनाचा निर्णय मागे घेण्यासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष उभारावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या आंदोलनाचे आवाहन कॉ. मरियम ढवळे, डॉ. अजित नवले, प्रा. अजित अभ्यंकर, कॉ. विजय गाभणे, कॉ. किरण गहला, डॉ. अमोल वाघमारे, कॉ. अमोल मारकवार, कॉ. संगीता साळवे, डॉ. महारुद्र डाके आणि कॉ. सुदाम ठाकरे यांनी केले आहे.

# अहिल्यानगर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेस ५ कोटींचा नफा - चेअरमन नागरे

अहिल्यानगर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अहिल्यानगर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेस सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये ५ कोटी ८ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला असून, आवश्यकता तरतुदी रक्कम रुपये ४ कोटी ४० लाख ५८ हजार रुपये वजादा संस्थेस निव्वळ नफा ६७ लाख ५२ हजार रुपये झाला असल्याची माहिती चेअरमन सुनील नागरे यांनी दिली.



या नफ्यातून संस्थेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करणार असल्याचे त्यांनी सांगितले. चेअरमन नागरे यांनी सांगितले, मार्च २०२५-२६ पासून संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांना विवाहप्रसंगी ११००० रुपये धनादेश देण्यात येतो. दरवर्षी सभासदांना दीपावलीनिमित्त १५ किलो साखर वाटप करण्यात येते. मयत सभासदांना शंभर टक्के कर्ज माफ केले जाते. राज्यात पगारदार कर्मचाऱ्यांची पतसंस्था सर्वाधिक कर्ज वितरण करणारे एकमेव पतसंस्था असून, संस्थेच्या सर्व सभासदांना ४० लाख रुपये विमा कवच देण्यात आलेले आहे. संस्था स्थापनेपासून ऑडिट वर्ग अ आहे. पतसंस्थेत ठेवीवर साडेदहा टक्के व्याज दिला जातो.

ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज पाटील म्हणाले, ग्रामसेवकांचे नेते एकनाथ ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था गेली ३६ वर्ष यशस्वीरित्या वाटचाल करत आहे. 'एकच ध्यास सभासदांचा विश्वास' या युक्तीप्रमाणे पतसंस्था मार्गक्रमण करत आहे. संस्थेमार्फत वर्षभरात विविध उपक्रम राबवले जातात. प्रत्येक कार्यक्रमाला सभासदांचे भक्कम पाठबळ मिळत असते.

यावेळी जिल्हाध्यक्ष युवराज पाटील, जिल्हा सरचिटणीस अशोक नरसाळे, व्हा. चेअरमन सुनील वाघ, मानद सचिव सविता भाकरे, संचालक सतिश मोटे, दिलीप नागरगोजे, शामराव भोसले, मंगेश पुंड, रूबाब पटेल, किसन भिंगारदे, उध्दव जाधोर, संदीप लगड, वाळू मुंढे, भगवान खेडकर, रामदास गोरे, नारायण खेडकर, सुरेश मंडलिक, अशोक खळेकर, भाऊसाहेब गायकवाड, राणी वाघ, तज्ज्ञ संचालक मधुकर जाधव, एकनाथ ढाकणे, लक्ष्मण नागरे, पसंस्थेचे व्यवस्थापक प्रदीप कल्याणकर, वरिष्ठ सहायक नफीसखान पठाण आदी उपस्थित होते.

# अंग्लो उर्दू कॉलेजचा एच.एस.सी. परीक्षेत शानदार निकाल

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्ट संचलित अंग्लो उर्दू ज्युनिअर कॉलेज, संगमनेर एच.एस.सी. परीक्षा २०२६ इयत्ता १२वी कला शाखेचा निकाल ८९.६५ टक्के व विज्ञान शाखेचा निकाल ९६.८० टक्के लागला आहे. इयत्ता १२वी कला या शाखेत कुमारी अक्सा जावेद शेख यांनी ७९.६७ टक्के घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला, तर कु. जुवेरीया अतिक शेख ६९.८३ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक व कु. मारिया आबिद खान यांनी ६५.८३ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकाविले. विज्ञान या शाखेत कु. मोहम्मद आरीज अश्फाक शेख यांनी ६९ टक्के घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला, तर कु. रझिया इलीयास शेख यांनी ६३.५० टक्के घेऊन द्वितीय क्रमांक प्राप्त केले, तर कु. आफिया मुदस्सर सय्यद ६३.३३ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकाविले.

संस्थेचे विश्वस्त व अंग्लो उर्दू हायस्कुल कमिटीचे चेअरमन शेख गनी हाजीसेठ, संस्थेचे चीफ ट्रस्टी चौधरी अब्दुल्लाह हाजी हसन, सचिव हाजी पठाण शौकतखान मोहंमदखान, संस्थेचे विश्वस्त शेख नजीर ताज मोहम्मद, पठाण अय्युब खान हुसैन खान, श्री. हाजी शेख एजाज शमशुद्दीन, हाजी शेख जमील अहमद फतेह मोहम्मद, तसेच शाळा समिती सदस्य हाजी इनामदार शमसुद्दीन जैनुद्दीन सर, हाजी शेख दस्तगीर बुढन भाई व शेख इरफान हाजी फजलोद्दिन सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व या शानदार यशाचे श्रेय सर्व शिक्षकांना दिले. तसेच उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. शेख मुनव्वर खलीलूरहमान सर व पर्यवेक्षक रहमानी उबेदूरहमान कालीमुररहमान यांनी प्राप्त यशाचे श्रेय सर्व शिक्षक वर्गाला दिले व त्यांचे कौतुक केले. उच्च माध्यमिक विद्यालयाच्या या यशाचे पालक वर्गाकडून कौतुक होत आहे.

# टाहाकरीत हेरिटेज वॉक, प्राचीन जगदंबा मंदिरास अभ्यास भेट

## सहकारमहर्षी भा. सं. थोरात महाविद्यालय व जिजामाता स्कूलचा संयुक्त उपक्रम

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
ऐतिहासिक वारशाची ओळख करून देत विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजितया उपक्रमाअंतर्गत अकोले तालुक्यातील टाहाकरी येथील प्राचीन जगदंबा मंदिरास अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजक सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय इतिहास विभाग व जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल हे होते. तालुक्यातील ऐतिहासिक वारसा जपण्याच्या व नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला.



अकोले तालुक्यातील चार महत्त्वपूर्ण मंदिरे - अमृतेश्वर मंदिर, हरिश्चंद्रेश्वर मंदिर, जगदंबा मंदिर व सिद्धेश्वर मंदिर - यांपैकी टाहाकरी येथील प्राचीन जगदंबा मंदिरास मंडळाच्या सदस्यांनी भेट दिली. या मंदिरातील अष्टभुजा महिषासुरमर्दिनी देवीची मूर्ती, शेजारील गण व शिवलिंगाची स्थापत्यशैली अत्यंत देखणी असून, उपस्थितांनी शिल्पकलेचे बारकाईने निरीक्षण केले.

या वेळी मंदिराची ऐतिहासिक व शिल्पकलात्मक माहिती डॉ. उल्हास कुलकर्णी यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व रसाळपणे उपस्थितांना दिली. या हेरिटेज वॉकचे संयोजक प्राध्यापक विठ्ठलराव शेवाळे यांनी अकोले व संगमनेर तालुक्याच्या मागील काही दशकांतील इतिहासावर प्रकाश टाकला. या सहलीचे काटेकोर नियोजन प्रा. शेवाळे सर यांनी केले.

या उपक्रमासाठी डॉ. माणिकराव शेवाळे यांनी जिजामाता इंग्लिश मिडियम स्कूलच्या स्कूलबसची मोफत सोय उपलब्ध करून दिली. प्रकल्प प्रमुख रमेश थोरात सर यांच्या पुढाकाराने या हेरिटेज वॉकची सुरुवात झाली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम यशस्वी होत आहेत.

सकाळी ठीक ७:१५ वाजता संगमनेर बस स्थानकातून सहलीस प्रारंभ झाला. सकाळी ९:०० वाजता टाहाकरी येथे पोहोचल्यानंतर मंदिराची सविस्तर माहिती जाणून घेण्यात आली. देवस्थान ट्रस्टतर्फे सर्व सहभागी सदस्यांना अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. याबद्दल देवस्थानचे विश्वस्त श्री. एखंडे यांचा मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. परतीचा प्रवास सकाळी ११:३० वाजता सुरू होऊन दुपारी १:१५ वाजता सर्व सदस्य संगमनेर येथे सुखरूप परतले.

या उपक्रमामुळे संगमनेर व अकोले तालुक्यातील प्रेक्षणीय, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती सर्व सदस्यांना झाली. या यशस्वी उपक्रमात संयोजक प्रा. विठ्ठलराव शेवाळे, डॉ. माणिकराव शेवाळे, प्रकल्प प्रमुख रमेश थोरात, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, इतिहास विभागातील प्रा. श्रीकांत डापसे, प्रा. कांबळे दत्तात्रय, संगमनेर अकोले तालुक्यातील अभ्यास प्रेमी इतिहास विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी आजचा उपक्रम अत्यंत आनंददायी, माहितीपूर्ण व प्रेरणादायी ठरल्याची भावना व्यक्त केली.

# डॉ. भानुदास जी. डेरे ज्युनिअर कॉलेजची यशाची परंपरा कायम; १२ वीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल



कु.सायली अमोघ कुलकर्णी. कु. स्वयंम अशोक हांडे. कु. अनुष्का सचिन चांडक

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर येथील नामांकित डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा यावर्षीही कायम राखली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेत महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या या परीक्षेत महाविद्यालयातील कु. सायली अमोघ कुलकर्णी हिने ९२.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच, कु. स्वयंम अशोक हांडे याने ८८.८३ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. अनुष्का सचिन चांडक हिने ८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केवळ उत्तीर्णच नव्हे, तर उत्तम गुणांसह यश मिळवले आहे. यामध्ये ७० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणारे १३ विद्यार्थी आहेत. तसेच, ६० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केलेले २३ विद्यार्थी आणि ५० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणारे ३५ विद्यार्थी आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. भानुदास डेरे, उपाध्यक्ष अॅड. श्रीराज भानुदास डेरे, अंकिता श्रीराज डेरे, महाविद्यालयाचे प्राचार्य सुनीलकुमार शुक्ला, प्राथमिक विभागाच्या उपप्राचार्या हरिजींद्रकौर बत्रा यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष कौतुक केले आहे. तसेच, विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षक व पालकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगत, सर्व गुणवंतांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा

# संपादकीय...

### पुण्यतिथीनिमित्त

## लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज!

६ मे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०४ वी पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव, तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर (करवीर) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले, कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्याभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत, म्हणजे २८ वर्ष, ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला, म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतून बाहेर काढून, तत्कालीन रूढी-परंपरा नाकारून, त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्त्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले, तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल, हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली, त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे, या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये शिष्यवृत्ती सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना, कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती, हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्टीहीन पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा, यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल, तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे, हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवदासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी, म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही, तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड विविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे, असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहेत. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना शिष्यवृत्ती दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले, पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले. जेव्हा हे शाहू महाराजांना समजले, तेव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे.


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/४०२/२०२६ संगमनेर, दिनांक - ०६/१०/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. खंडु धोंडीबा कोठवळ, रा. वडगाव लांडगा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १५/०७/२०२५ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. वडगांव लांडगा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे खंडु धोंडीबा कोठवळ यांचा जन्म मौजे महालवाडी,ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०२/०६/१९६५ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी महालवाडी या कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी महालवाडी यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


# श्रीमती सोनार यांना दीपस्तंभ शिक्षक सन्मानपत्र प्रदान

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- जिल्हा परिषद नाशिक व शिक्षण विभाग प्राथमिक यांच्या समन्वयातून आयोजित दीपस्तंभ - शिक्षक सन्मान सोहळा २०२५-२६ अंतर्गत जिल्हा परिषद दरेवाडी शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका श्रीमती वंदना सोनार यांना विद्यमान शैक्षणिक वर्षात पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणात मास्टर ट्रेनर म्हणून उत्तम कामगिरी केल्याबद्दल नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार व प्राथमिक गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी यांच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक दीपस्तंभ शिक्षक सन्मानपत्र व भेटकार्ड प्रदान करून



गौरविण्यात आले आहे.

याबद्दल श्रीमती सोनार यांचे इगतपुरी तालुका पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी श्रीमती मंजुषा साळुंखे, केंद्रप्रमुख विजय पगारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणपत गावंडा, मुख्याध्यापक संजय गातवे, सहशिक्षक महेश खैरनार व काळुस्ते केंद्रातील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# धार्मिक संस्थांच्या पाठीमागे उभा राहणार - आ. खताळ



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- वारकरी कुटुंबातील संस्कारांमुळे माझा धार्मिक कार्यक्रमांकडे विशेष ओढा आहे. संगमनेर तालुक्यातील विविध देवस्थाने व धार्मिक उपक्रमांसाठी माझा आमदार निधी उपलब्ध करून दिला असून, भविष्यात अशा संस्थांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणार असल्याचा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

घुलेवाडी येथील ज्ञानराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित महर्षी सांदिपनी गुरुकुल आश्रमामध्ये आयोजित बालसंस्कार शिबिर व गुरुकुलाच्या वर्धापन दिन सोहळ्याला मार्गदर्शन करताना आ. खताळ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कीर्तन केसरी अक्रूर महाराज साखरे, उद्योजक गोरख कुटे, आनंद महाराज काळे, रोहिदास महाराज बर्गे, प्रदीप ढमाले, उपसरपंच सुभाष कुटे, राम पावळ, विलास महाराज कुटे, भाऊसाहेब सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, देश टिकला तर धर्म टिकणार आणि धर्म टिकला तर देश टिकणार आहे. यासाठी संस्कारांची सुरुवात आजच्या पिढीकडून होणे गरजेचे आहे. हे संस्कार देण्याचे काम गुरुकुल आणि धार्मिक संस्थांमार्फत होत असलेले संस्कारमय कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. आजचे लहान वारकरी आणि संस्कार घेत असलेली पिढी भविष्यामध्ये धर्म आणि अध्यात्माचा प्रसार करणारी ठरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराज यांच्या विचारांची परंपरा महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत रुजलेली आहे. अध्यात्म आणि संस्कारांच्या बळावरच भारत देश हा जगामध्ये शक्तिशाली बनला असून, भविष्यातही भारताकडे कुणाचीही वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

# विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या अविरत प्रयत्नांतून सह्याद्रीची यशोगाथा - माजी आमदार तांबे



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर होताच सह्याद्री ज्युनिअर कॉलेज, संगमनेरने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यंदा सार्थक बिबवे आणि शुभांगी गौतम यांनी अनुक्रमे विज्ञान व कला शाखेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच भौतिकशास्त्र आणि गणित या विषयात राज्यात पहिला क्रमांक मिळवत सह्याद्रीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत प्राचार्य खेमनर एस. एम. सर यांनी केले. आपल्या प्रास्ताविकेत त्यांनी वर्षभरातील विविध उपक्रमांची व बारावीच्या उज्ज्वल निकालाची यशोगाथा नमूद केली.

समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. सुधीर तांबे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, यश हे योगायोगाने मिळत नाही; ते सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासातील शिस्त आणि मानसिक स्थैर्य यांचा परिणाम असतो. दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर मिळणारे यशच टिकाऊ ठरते आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याची भक्कम पायाभरणी करते. ते पुढे म्हणाले की, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज ही संस्था विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारून कार्यरत आहे. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीत सुधारणा करणे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणे ही संस्थेची प्राथमिकता आहे. पालक, शिक्षक आणि संस्था यांच्यातील सुसंवाद हा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आधारस्तंभ असून, पालकांनीही रचनात्मक सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना नमूद केले की, सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपली आहे. शिक्षकांना सक्षम करण्यासाठी नियमित प्रशिक्षण उपक्रम राबवले जातात, ही बाब संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीची किल्ली आहे. संस्थेचे संचालक बाबा खरात यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या चिकाटीला, पालकांच्या पाठबळाला आणि शिक्षकांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाला दिले. 'डायमंड बॅच' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली असून, ही यशाची मालिका पुढेही कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तालुक्यात प्रथम आलेल्या सार्थक बिबवे या विद्यार्थ्याने नियमित अभ्यास, वेळेचे काटेकोर नियोजन आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन यांना यशाचे प्रमुख घटक मानले. साप्ताहिक चाचण्या आणि शंका-निरसन सत्रांमुळे अभ्यासातील त्रुटी वेळेवर दुरुस्त करता आल्या, असे त्याने सांगितले. शुभांगी गौतम या विद्यार्थिनींनी सातत्य, आत्मविश्वास आणि योग्य मार्गदर्शन यामुळेच यश शक्य झाल्याचे नमूद केले. वाणिज्य शाखेच्या स्नेहल हासे या विद्यार्थिनीने शिक्षक मेहनत घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करतात, असे मनोगत व्यक्त करताना सांगितले.








# जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल** — We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४ — डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

## गाळे भाडेतत्वावर देणे आहे

शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे

ग्राऊंड फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट

फर्स्ट फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट

पत्ता - नाशिक-पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर

संपर्क - 7755965616, 9422737484

## पाहिजेत

वामनराव इथापे बी.एच.एम.एस. कॉलेजकरिता खालील पदे भरणे आहे

अकौंटंट - ०२ जागा, पात्रता - बी.कॉम/ एम. कॉम

कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२ जागा, पात्रता - बी. कॉम

एल.एम. व्ही. वाहन चालक - ०३ जागा, अनुभवी

वॉचमन - ०३ जागा

पत्ता- डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर

संपर्क - 9370071777, 9518556933, 9822791484

## ड्रायव्हर पाहिजे

ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा

मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा

निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे

8668269897

## पाहिजेत

सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे

- **टेलीकॉलिंग** — 10 जागा — फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
- **प्रोडक्शन लाइन** — 10 जागा — पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
- **Dispatch सुपरवाइझर** — 02 जागा — (कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य )
- **ड्रायवर** - पगार- १५ हजार — 05 जागा — (ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)

अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00

**सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज**, संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A , संगमनेर, जि. अ.नगर — 9699363221

## भाड्याने देणे आहे

रुम भाड्याने देणे आहे

२०० स्क्वे.फुट सर्व सुविधांयुक्त

पत्ता- शिवाजी नगर गल्ली, नं.१,संगमनेर

९४०४९१७९१२, ९४०३१५४०१७

## पाहिजेत

युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे

- उपसंपादक - १
- जाहिरात व्यवस्थापक - १
- डिझायनर - १
- वितरण व्यवस्थापक - १
- टेलिकॉलर - १

कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर

फोन (०२४२५)२६१८७२, ७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

## भाड्याने देणे आहे

सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला १२ X १२ फूट गाळा

भाड्याने देणे आहे

हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे

८२८२८२५८१८

## ड्रायव्हर पाहिजे

गिअर आणि ऑटोमॅटिक कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे

आकर्षक पगार

श्री गुलाब आर्च

संपर्क - नविन नगर रोड, संगमनेर

8378956909, 8459199913

## पाहिजेत

अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत

जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)

मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर

9822523424

## पाहिजेत

श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, विडोल ऑईल संगमनेर या फर्मसाठी

अकाउंटंट - १ जागा (बी. कॉम/ टॅली)- पुरुष

सेल्समन - १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)

पगार - १४०००+ इन्सेंटिव्ह

शिक्षण - बारावी व त्यापुढील

8999862759

## पाहिजेत

मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)

फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)

रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी

सप्तश्रृंगी हॉस्पिटल ॲण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर

9657230023

## पाहिजेत

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९, ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# प्रशासकीय अधिकाऱ्यांची संगमनेर महाविद्यालयाला सदिच्छा भेट


छाया– प्रसाद सुतार (शिरसाठ), संगमनेर

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ.) आनंद भंडारी आणि जिल्ह्याचे नवनिर्वाचित पोलीस आयुक्त मुम्मका सुदर्शन यांनी नुकतीच संगमनेर महाविद्यालयाला सदिच्छा भेट दिली.

याप्रसंगी शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी सर्व पाहुण्यांचे उत्साहात स्वागत केले आणि त्यांना महाविद्यालयाच्या विविधांगी कामकाजाची तसेच शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

या भेटीदरम्यान पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे, मधुसूदन नावंदर, सदस्य, शिक्षण प्रसारक संस्था, आर. सी. शाह, संगमनेर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष नुरमंहमद शेख, नगरसेवक नितीन अभंग तसेच डॉ. निलेश सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीबद्दल मान्यवरांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

# अशोक खरात शिर्डी पोलिसांच्या ताब्यात



शिर्डी (प्रतिनिधी)-
शिर्डी पोलिसांनी भोंदूगिरी व अवैध सावकारी प्रकरणातील मुख्य आरोपी अशोक खरात याला नाशिक येथून ताब्यात घेतले आहे. शिर्डीत शेतकऱ्याची आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपावरून खरात आणि त्याच्या पत्नीवर गुन्हा दाखल असून, पुढे होणाऱ्या तपासात फसवणूक करणाऱ्या साखळीचे धागेदोरे उलगडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी, की आरोपी अशोक खरात आणि त्याच्या पत्नीने शिर्डीतील शेतकऱ्याला विविध आमिषे दाखवत आर्थिक गंडा घातल्याचा आरोप आहे. भोंदूगिरीच्या माध्यमातून विश्वास संपादन करून नंतर पैसे उकळल्याचे तपासात समोर येत आहे. याशिवाय, कायद्याचे उल्लंघन करून बेकायदेशीर सावकारीचे जाळे उभारल्याचाही संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी राहाता ग्रामीण रुग्णालयात करण्यात आली. सध्या अशोक खरात शिर्डी पोलीस ठाण्याच्या कोठडीत असून त्याची सखोल चौकशी सुरू आहे. चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या कारवाईमुळे भोंदूगिरीच्या आडून सुरू असलेल्या फसवणूक साखळीवर मोठा आघात बसण्याची चिन्हे असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
NASIR A R DARUWALE
TO NEW NAME AS
NASIR ABDUL REHMAN SHAIKH
ADD:- BHARAT NAGAR, JAMIR FIREWORKS SANGAMNER,422605, DIST- AHILYANAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AHMED BIBAN TAMBOLI
TO NEW NAME AS
AHAMAD BIBAN TAMBOLI
VID AADHAAR NO - 8532 8024 4286
ADD - AT SAMNAPUR, TAL SANGAMNER 422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SAIRAJ SARJERAO DIGHE
TO NEW NAME AS
SAIRAJ SARJERAV DIGHE
AFFIDAVIT NO : 26524220212681O1244266
ADD - AT SANGAMNER, TAL SANGAMNER 422605

# जिल्ह्यात ६५१ सहकारी संस्था बंद, २२९ संस्थांची नोंदणी रद्द

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-
सहकारी संस्थांचा कणा समजल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातच काही दिवसांपासून सहकाराला ओहोटी लागल्याचे चित्र आहे. लेखापरीक्षण नाही, व्यवहार नाहीत, संस्थेचा पत्ताही सापडत नाहीत, अशा वेगवेगळ्या कारणांनी आतापर्यंत तब्बल ६५१ सहकारी संस्था अवसायानात काढण्यात आल्या असून, गत वर्षभरातच १६५ संस्थांवर अशी कारवाई झाली आहे.दरम्यान, यातील २२९ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.गेल्या काही दिवसांपासून ‘त्या’ पतसंस्थांमधील घोटाळ्यांमुळे सहकार विभागाच्या कार्यपद्धतीवर आणि देखरेखीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अनेक संस्था कागदावर दिसतात, मात्र त्या शोधूनही सापडत नाहीत. सहकार विभागाच्या नोंदीनुसार, गेल्या काही वर्षांत सहकार कायद्याचा भंग करणाऱ्या काही संस्था निष्क्रिय झाल्या आहेत. त्यांच्यावर टप्प्याटप्प्याने कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. २०२४-२०२५ पर्यंत अशा ४८६ संस्थांवर अशी कारवाई केली आहे. तर २०२५-२६ या वर्षभरात आणखी १६५ संस्था अवसायानात काढण्यात आल्या आहेत. त्यामुळे आतापर्यंत ६५१ संस्थांना टाळे लागले आहेत. या संस्थांना अवसायनात आणण्यामागे विविध कारणे पुढे येत आहेत. त्यात ऑडिट रिपोर्ट सादर न करणे, वेळेवर नोटिशीला उत्तर न देणे, संस्था स्थापन केल्यापासून व्यवहार न करणे, आवश्यक माहिती देण्यास टाळाटाळ करणे, अशा अन्य काही गंभीर त्रुटींचा यात समावेश आहे. संबंधित संस्थांवर जिल्हा उपनिबंधक यांच्या मार्गदर्शनात अवसायनात काढण्याची कारवाई केली जाते. त्यावर अवसायक नेमून पुढील कार्यवाही केली जात आहे. ६५१ पैकी २२९ संस्थांना दोषी ठरवत त्यांची नोंदणी रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

# लोटस स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन व सन्मान सोहळा उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
कै. मातोश्री भागीरथी सिताराम निघुते मेमोरियल फाउंडेशन, संगमनेर यांच्या वतीने आयोजित महाराष्ट्र दिन व सन्मान सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या इतिहास, संस्कृती, परंपरा व वैभवावर आधारित भाषणे, गीत व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व गौरवपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी उपस्थित असणारे मान्यवर शाळेचे संस्थापक डॉ. शांताराम निघुते, संचालिका डॉक्टर नीलिमा निघुते, सचिव सत्यजित निघुते, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह देविका निघुते, सीईओ वैशाली निघू ते, संचालक हेमंत पवार सर, बाळासाहेब बनवटे, नितीन पवार सर, जय पवार, प्राचार्य आशालता शेट्टी, उपप्राचार्य सारा रोहम यांच्या हस्ते सौ. निलांबरी कोर्टीकर यांना स्वर साधना गौरव सन्मान, सौ. आरती देशमुख यांना कर्तृत्व शालिनी सन्मान, सौ. सुवर्णा शानपुते यांना भागीरथी प्रेरणा सन्मान, सौ. कल्याणी सोनवणे यांना कर्तृत्व शालिनी सन्मान, सौ. उर्मिला कांबळे यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार, श्री. बबासाहेब वाकचौरे यांना कर्मयोगी गौरव सन्मान प्रदान करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अभिमान बाळगून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन केले. संस्थेच्या प्रगतीसाठी योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींचा गौरव करण्यात आल्याने कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चित्रलेखा चोपडे व प्रेसिला गायकवाड यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# धांदरफळला गुरुवारी ‘हिंदुत्व जागर विचार’ कार्यक्रम

## आ. अमोल खताळ यांच्या वाढदिवसानिमित्त धर्मनाद प्रतिष्ठान व ग्रामस्थांचा उपक्रम




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
धर्मनाद प्रतिष्ठान आणि धांदरफळ खुर्द ग्रामस्थ यांच्यावतीने शिवसेना महायुतीचे आमदार अमोल खताळ पा. यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी सुप्रसिद्ध हिंदुत्ववादी कीर्तनकार तथा शिव चरित्रकार अनिल महाराज देवळेकर यांचे ‘हिंदुत्व जागर विचार’ या विषयावर कीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती धर्मनाद प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजी. आशीष कानवडे व भागवत कानवडे यांनी दिली.

धांदरफळ खुर्द येथील बिरोबा महाराज मंदिराच्या सभागृहात पार पडणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमास राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पा., तसेच नेवासा विधानसभा मतदार संघाचे आमदार विठ्ठलराव लंघे पा. आणि आमदार अमोल खताळ पा. उपस्थित राहणार असून, त्यांच्या हस्ते धांदरफळ बु. व चंदनापुरी जिल्हा परिषद गटातील भजनी मंडळांना वारकरी साहित्य किटचे वाटप केले जाणार आहे. तरी परिसरातील सर्वांनी या धार्मिक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मनाद प्रतिष्ठान आणि धांदरफळ खुर्द ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# “स्वराज्याचं आख्यान” : शिवप्रेम जागवणारा अद्वितीय नाट्यप्रयोग

## पोहेगांवच्या अभिजित गायकवाडचा रंगमंचावर शिवगौरवाचा प्रभावी आविष्कार




जयशिवराय
मुंबई (एअरपोर्ट) विमानतळ परिसरातील विलेपार्ले नावाच्या पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ प्रख्यात अशा दिनानाथ मंगेशकर नाट्यगृहात काल रात्री शिवप्रेमीं नाट्यरसिकांची तुडुंब गर्दीने भरलेलं होतं. काही तांत्रिक कारणास्तव प्रयोगाला तसा उशीरही झालेला होता. एरवी घडाळ्याच्या काट्यावर चालणाऱ्या मुंबई शहरात रात्री ८.३० चे ९.२० म्हणजे खूपच झाले. परंतु शिवप्रेमी विले-पार्लेकरांनी दाखविलेला संयम खूपच वाखाणणीय होता.

या सर्व दर्दी शिवप्रेमी नाट्यरसिकांच्या साक्षीने पोहेगांवची (कोपरगांव, अहिल्यानगर) नाळ असलेले नाशिक शहरातील प्रसिद्ध भारूड कलाकार श्री. राजेंद्र बबनराव गायकवाड यांचे सुपुत्र आणि सुप्रसिद्ध युवा मालिकावीर आणि भावी नाट्यसम्राट चि. अभिजित राजेंद्र गायकवाड नावाचा तरुण अभिनेता हा नाट्यरसिकांच्या तुडुंब गर्दीने भरलेल्या मुंबईच्या नाट्यगृहात स्वराज्याचं आख्यान ह्या नाट्याचा २५ वा प्रयोग सादर करत होता. मला माझ्या प्रिय मातोश्रींसह सहकुटुंब उपस्थित राहण्याचं भाग्य पदरी पडलं.

अगदी प्रारंभीच राजमाता जिजाऊं, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नव्हेतर स्वराज्याच्या आऊसाहेब यांना नमन करून त्यांचे आशीर्वाद घेत आपल्या चि. अभिजितने आख्यानाला सुरुवात केली. जिजाऊंच्या मातृप्रेमाच्या पदराची ऊब आणि त्यांचा महिमा अभिजीतने प्रत्येक नाट्यरसिकांच्या हृदयाला भिडवला. जीवनात मातेच्या मायेची ऊब प्रत्येक रसिकांना जाणवेल अशा काही भूमिकेत शिरून जिजाऊंच्या हिंदवी स्वराज्याचं (स्वराज्य) स्वप्न रसिकांसमोर मांडताना त्याने आख्यानाला छेडले आणि शिवप्रेमाला जागृत होऊन हजर असलेल्या प्रत्येक रसिकाला नम्रतेने उभे राहून महाराजांना नमन करण्यास भाग पाडले.

मंचाकडे नतमस्तक होऊन महाराजांच्या जिरेटोपाला नमन करेपर्यंत त्याच्या अभिनयाची ताकद पणाला लावण्याचा आवेगाने साक्षात महाराजांचा आशीर्वाद घेऊनच मंचाचा ताबा (आपण प्रत्यक्ष एक एक गड स्वराज्यात सामील करत असल्याचा तो अनुभव) मिळवत गेला. सर्व रसिकांना आपण कधी नाट्यगृहाचे कैदी बनून गेलो हे देखील कळले नाही. आम्ही उभयतां तर आमचा एक पोहेगांवकर मुंबईत येऊन रंगमंचावर महाराजांची मोहिम फत्ते करत आहे, याचा आनंद घेत घेत तीन तास खुर्चीला खिळून मंत्रमुग्ध झालेलो होतो.

मुगलप्रेमी उदयखान राठोड नावाच्या राजपूताला पाणी पाजून आधी कोंढाण्यांचं लग्न लावणारा स्वराज्याचा सिंह, शूरवीर तानाजी मालुसरे पासून सुरुवात झाली आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्याप्रती निस्सीम आदर आणि निष्ठेची कस लावणाऱ्या शूरवीरांच्या धाडसी शौर्याची थरार गाथा प्रत्येक शिवप्रेमी रसिकांच्या हृदयाला जाऊन भिडली. मोठ्या अभिमानाने संपूर्ण नाट्यगृहातील रसिकांच्या अंगावरील रोमरोम पेटवत, गर्वाने उत्साहित होत गेला तो अभिजीतने प्रस्तुत केलेल्या शेवटच्या शब्दापर्यंत.

रोमहर्षक पोवाडा, डफली, ढोल, संबळ, बासरींच्या तालावर स्वरबद्ध स्वलिखित गाणी, स्वलिखित कथेचं आख्यानाचं अतिउत्तम सादरीकरण! एक एक करून बहिर्जी नाईकपर्यंत ९ शूरवीरांची भूमिका सादर करणाऱ्या अभिजितच्या अभिनयात शिवस्मृती जागृत करण्याची धमक, मराठी बाणा पेटविण्याची दाणादाण जाणवली. त्याचे रंगमंचावरील हावभाव आणि कधी करड्या तर कधी लयबद्ध अशा अलंकृत आवाजाने प्रेक्षकांना भुरळ घातली.

क्षणिक स्व. दत्ता भट, स्व. डॉ. काशिनाथ घाणेकर, नाना पाटेकर यांसारख्या सुप्रसिद्ध सिने-नट आणि नाट्य कलाकारांच्या आवाजातील आक्रमकता सध्या हास्यजत्रेच्या विळख्यात लोप पावते की काय असा प्रश्न पडत असताना, त्याच तोडीची कस लावून आवाजातील चढ-उतार, उद्वेग, आक्रोश आणि मृदू लिलया यातील समतोल साधणारा चि. अभिजीत सारख्या कलाकाराच्या रंगमंचावरील दुमदुमणाऱ्या आवाजातून या सुप्रसिद्ध सिने-नट आणि नाट्य कलाकारांच्या आवाजाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. या सर्व गुणसंपन्न अविष्कार लाभलेल्या नाशिकच्या युवा नवकलाकाराकडून अजून बरंच काही सादर होणार, याची खात्री पटली.

छत्रपती शिवाजी महाराजांची शिवगौरव गाथा राज्यातील एस एस सी पाठ्यक्रमात महाराष्ट्र राज्यातील संपूर्ण शालेय पाठ्यपुस्तकात एस एस सी पॅटर्नमध्ये फक्त ८० पानांत सीमित आहे, ही लज्जास्पद बाब आहे. आणि सध्याच्या तरुण पिढीला भुरळ घातलेल्या केंद्राच्या सी बी एस सी / आय सी एस सी बोर्डाच्या पाठ्यपुस्तकात ती फक्त ६८ शब्दांनी सीमित केलेली आहे, ही वस्तुस्थिती मराठ्यांसाठी किती लाजिरवाणी आहे.

येणारी नवीन पिढी ८००० पाने कमी पडतील असा छत्रपतींचा शिवाजी महाराज आणि त्यांच्या स्वराज्याचा महाकाय इतिहास केवळ ६८ शब्दांत कसा शिकणार. नवीन पिढीच्या माहितीकरता मावळे मराठ्यांची शौर्यगाथा आता नाट्यरूपात पोहोचविण्याची जबाबदारी ओळखून स्वराज्याचं आख्यान नाट्यरूपाने सादर करण्यात श्री. कृतार्थ कंसारा ह्या नाशिकच्या युवकाने निर्मितीचा मोठा भार सांभाळून महाराजांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा थोर प्रयत्न केलेला आहे. त्याच्या या शुभकार्याला यश लाभणार, याची तिळमात्र शंका नाही.

स्वराज्याचं आख्यान या तीन तास मनोरंजक माहिती आपल्यापर्यंत पोहोचविणाऱ्या संपूर्ण टीमला (केवळ २०-२८ वर्ष वयोगटातील सर्व कलाकार) एकत्रित मोल बांधण्याची सांगड अभिजीतच्या चतुर्भुज क्षमतेची जाणीव करून देते. स्वराज्याचं आख्यान सादर करतानाच ते कलाकारांपुरतं मर्यादित नसून नाट्यगृहातील प्रत्येक रसिक शिवप्रेमींना आपल्या मालकीचं आहे, याची नक्कीच आपल्याला जाणीव करून देत जातं आणि स्वरमय होत जातं.

महाराष्ट्र राज्यालाच नव्हे तर भारतवर्षाला अभिमान वाटेल असं स्वराज्याचं आख्यान महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिक, शिवप्रेमींनी, विशेष करून युवा मंडळीने जरूर एकदा नाट्यगृहात जाऊन बघावं आणि एकदा तरी महाराजांना अपेक्षित अशा या स्वराज्याच्या मोहिमेचे साक्षीदार होण्याची ईर्षा मनात बाळगावी. इतक्या उच्च प्रतीचे नवलिखित गाण्यांची रेलचेल (वन्समोरची मागणी करणारी गायक-गायिका, वाद्य कलाकार), पोवाडे, गवळण गायन, संगीत आणि आवेशांत सुंदर नाट्य अविष्कारांसह उत्तम प्रकाशयोजनेत सादरीकरण ही ओळख आपणा सर्वांना नाट्यगृहापर्यंत नक्कीच खेचून घेईल, ही आशा बाळगतो. पुनःश्च पोहेगांवकर श्री. राजेंद्र बबनराव गायकवाड आणि आपला लाडका अभिनेता अभिजीत यांचे मनपूर्वक ₹९अभिनंदन₹९ आणि मनपूर्वक शुभेच्छा. अभिजित राजेंद्र गायकवाड हा उच्चकोटीचा सिने-कलाकार मुळ पोहेगांवचा (कोपरगांव, अहिल्यानगर) आहे याचा अभिमान वाटतो.

संगमनेर अकोले तालुका स्नेहवर्धक संघटना तसेच दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने स्वराज्य आख्यानाचे यशस्वी वाटचालीस शुभेच्छा...

**स्मिता अरविंद औताडे, मुंबई**
मोबा. ९८२१३५५४९०

आपल्या व्यावसयाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यावसयाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# कोपरगावात ऐतिहासिक जल्लोष !

## विवेक कोल्हेंचे भव्य स्वागत; "प्रत्येक कार्यकर्ता आमदारच" भावनिक साद

युवावार्ता (प्रतिनिधी) -

कोपरगाव- आमदारकीचा सातबारा जरी माझ्या नावावर असला, तरी त्यातील प्रत्येक पोटहिश्यात माझ्या कार्यकर्त्यांचे नाव आहे तुम्ही सगळे माझ्यासोबत आमदारच आहात! अशा हृदयस्पर्शी शब्दांत युवा नेते विवेक कोल्हे यांनी कार्यकर्त्यांना भावनिक साद घातली आणि वातावरण भारावून गेले.



भाजपकडून विधान परिषदेसाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आणि अर्ज दाखल केल्यानंतर मुंबईहून कोपरगावात दाखल होताच विवेक कोल्हे यांचे अभूतपूर्व आणि ऐतिहासिक स्वागत करण्यात आले. धन्यवाद देवाभाऊ! च्या गजरात त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

शनिवारी सायंकाळी समृद्धी महामार्गावरून शेकडो वाहनांच्या ताफ्यासह कोल्हे साईबाबा कॉर्नर येथे पोहोचले. त्यानंतर सुरू झालेली विजयी मिरवणूक रात्री उशिरापर्यंत रंगली. अत्याधुनिक जीप, उंट-घोड्यांची सजावट, ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांची आतषबाजी यामुळे संपूर्ण कोपरगाव शहर उत्सवमय झाले होते.

ठिकठिकाणी सुवासिनींनी औक्षण करून स्वागत केले, तर हजारो तरुणांनी सेल्फी आणि रील्ससाठी मोठी गर्दी केली. शहरभर आता थांबायचं नाही असे फलक झळकत होते. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे मिरवणुकीचा समारोप करताना कोल्हे भावूक झाले. ते म्हणाले, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिन कोल्हे आणि माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हा नवा राजकीय प्रवास सुरू झाला आहे. २०२४ मध्ये दाखवलेल्या संयमाचे फळ पक्षाने दिले आहे. देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठेवलेला विश्वास मी नक्की सार्थ ठरवेन. आता कुठेही अन्याय सहन करायची गरज नाही. तुमच्या कामांसाठी मी स्वतः पुढे उभा आहे, असा ठाम विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

कोल्हे यांनी यावेळी सांगितले की, पक्षाने केवळ तालुक्यापुरते नव्हे, तर संघटनात्मक पातळीवर मोठी जबाबदारी दिली आहे. मिरवणुकीपूर्वी त्यांनी कोल्हे कारखाना परिसरातील हनुमान आणि महादेव मंदिरात दर्शन घेतले. या प्रसंगी बिपिन कोल्हे, रेणुकाताई कोल्हे, सुमित कोल्हे, ईशान कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक आणि हजारो नागरिक उपस्थित होते. या दणदणीत स्वागत सोहळ्याने कोपरगावच्या राजकीय इतिहासात एक नवे, लक्षवेधी पान लिहिले गेले आहे.

# अक्षय कर्डिले यांचा दमदार विजय

विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले एक लाख ११ हजार ८२६ मतांनी विजयी झाले आहेत. निवडणूक आयोगाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, २७ व्या फेरीअखेर अक्षय कर्डिले यांना एकूण १ लाख ३९ हजार २१२ मते मिळाली आहेत. भाजपाचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनाने राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत भाजपाने स्व. शिवाजी कर्डिले यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देण्यात आली. अक्षय कर्डिले यांची ही राजकीय कारकीर्द ठरवणारी पहिलीच निवडणूक आहे.

अक्षय कर्डिले (भाजपा ) - १,३९,२१२, गोविंद मोकाटे (राष्ट्रवादी शरद पवार) - २७,३८६, संतोष चोळके (वंचित) - ५,६६३, रावसाहेब खेवरे (अपक्ष) - ७,२३४, (अक्षय कर्डिले - एक लाख ११ हजार ८२६ मतांनी विजयी).

पहिल्या फेरीत अक्षय कर्डिले यांना ४,९८८ मते मिळाली तर राष्ट्रवादीच्या गोविंद मोकाटे यांना केवळ ७२२ मते मिळाली. पहिल्या फेरीअखेर कर्डिले यांना ४,२६६ मतांची आघाडी मिळाली. कर्डिले यांना पहिल्या फेरीपासून मिळालेली आघाडी सोळाव्या फेरीअखेर कायम राहिली. अखेर २७ व्या फेरीअखेर अक्षय कर्डिले एकूण १ लाख ३९ हजार २१२ मते मिळवत विजयी झाले.



दरम्यान निकालाच्या काही वेळापूर्वी कर्डिले यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. जनतेने दाखवलेला विश्वास आणखी दृढ करण्याचा प्रयत्न करू. ही निवडणूक सर्वसामान्यांनी हातात घेतली होती. ही निवडणूक नव्हतीच तर प्रत्येक मतदाराने आपली स्व. शिवाजी कर्डिले यांच्या प्रति असलेली भावना मतातून व्यक्त केली आहे. गेली ३० वर्षे कर्डिले यांनी प्रत्येक कुटुंबात, प्रत्येकाच्या हृदयात घर केले होते, स्थान मिळवले होते. आज ते आपल्यासमवेत नाहीत. परंतु तेवढेच प्रेम, विश्वास जनतेने माझ्याबद्दल दाखवून मला संधी दिली आहे. आगामी काळात जनतेने दिलेली संधीचा उपयोग आपणही प्रत्येकाच्या मनात स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न करू, असे अक्षय कर्डिले म्हणाले. राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी प्रचंड मताधिक्याने दणदणीत विजय मिळवत राजकीय मैदान गाजवले. या विजयाने कर्डिले कुटुंबीयांमध्ये भावनिक वातावरण पसरले असून मतदारांनी दिलेल्या भरघोस पाठिंब्यामुळे हा विजय अधिकच खास ठरला आहे. विजयानंतर अक्षय कर्डिले यांनी थेट आपल्या वडील दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या स्मृतिस्थळाला दर्शन घेत अभिवादन केले. वडिलांच्या आठवणींनी भारावलेल्या या क्षणी वातावरण अत्यंत भावनिक झाले होते. त्यानंतर घरी परतताच कर्डिले कुटुंबीयांनी त्यांचे स्वागत केले.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता- श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# हॉटेल 'निलायम' वर चोरट्यांचा डल्ला

## तीन लाखांची विदेशी दारु लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील माहुली (ता. संगमनेर) शिवारात असलेल्या 'निलायम' परमिट रूममध्ये अज्ञात चोरट्यांनी शटरचे कुलूप तोडून सुमारे ३ लाख ६ हजार १९० रुपये किमतीच्या विदेशी दारूच्या साठ्यासह सीसीटीव्हीचा डीव्हीआर चोरून नेल्याची घटना रविवारी (दि.३) सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किशोर बाळाजी डोके (रा. खंदरमाळवाडी) यांचे माहुली शिवारात हॉटेल निलायम नावाचे परमिट रूम आहे. शनिवारी (दि.२) रात्री ११:३० वाजेच्या सुमारास हॉटेल बंद करून ते घरी गेले होते. दरम्यानच्या काळात अज्ञात चोरट्यांनी हॉटेलच्या शटरचे कुलूप कशाच्या तरी साहाय्याने तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी काउंटर जवळील तसेच गोदामात ठेवलेल्या नामांकित कंपन्यांच्या विदेशी दारूचे एकूण १८ खोके आणि विविध बाटल्यांची चोरी केली.

पुरावा नष्ट करण्यासाठी चोरट्यांनी हॉटेलमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा डीव्हीआर देखील सोबत नेला आहे. दरम्यान, रविवारी सकाळी १० वाजता डोके हॉटेलवर आले असता ही चोरी उघडकीस आली. त्यांनी तातडीने घारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी या घटनेचा पंचनामा केला असून ३ लाख ६ हजार १९० रुपयांचा माल चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल विलास कोकाटे करत आहेत.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा B.H.M.S., C.G.O., D.Ac होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक (३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)
१ लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमीओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25